जा.क्र./जिपसां/पशुसं/तां/१२४७/२०१९
पशुसंवर्धन विभाग, जि.प.सांगली
दिनांक :-०८ /०७/२०१९ .

**प्रति,**

**.मा. जिल्हा विज्ञान सुचना अधिकारी(NIC कक्ष)**
**जिल्हाधिकारी कार्यालय सांगली**

**विषय :- सन २०१९-२० मध्ये अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत अनुसुचित जातीच्या लाभार्थींना ७५% अनुदानावर ०२ दुधाळ जनावरांचे गट (२ गाय किंवा २ म्हैस) वाटप , शेळीगट (१० शेळया + १ बोकड) वाटप,या योजनांचे अर्ज www.sangli.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी बाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती की ,पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सांगली या विभागामार्फत सन २०१९-२० मध्ये अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत अनुसुचित जातीच्या लाभार्थींना ७५% अनुदानावर ०२ दुधाळ जनावरांचे गट (२ गाय किंवा २ म्हैस),शेळीगट (१० शेळया + १ बोकड) वाटप या योजना राबविणेची प्रक्रिया चालु आहे.**सदर योजनांचे अर्ज प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे कार्यालयामध्येही उपलब्ध असुन अर्ज स्वीकारण्याची मुदत दिनांक:-१०/०७/२०१९ ते दिनांक:-०९/०८/२०१९ पर्यत राहील. दिनांक:-०९/०८/२०१९ नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.** सदर योजनांच्या अर्जाचा नमुना जिल्हयाच्या **www.sangli.nic.in** या संकेतस्थळावर इच्छुक लाभार्थींना लाभ घेणेसाठी उपलब्ध ठेवावा ही विनंती.

**तालुकानिहाय लक्ष खालीलप्रमाणे -**

| अ.क्र. | तालुका | दुधाळ जनावरांचे गट लक्ष | शेळी गट लक्ष |
|---|---|---|---|
| १ | मिरज | २५ | १५ |
| २ | कवठेमहांकाळ | १४ | ८ |
| ३ | जत | २५ | १५ |
| ४ | आटपाडी | १० | ६ |
| ५ | खानापूर | १० | ६ |
| ६ | तासगांव | १५ | ९ |
| ७ | वाळवा | २५ | १५ |
| ८ | शिराळा | १० | ६ |
| ९ | पलुस | १२ | ७ |
| १० | कडेगांव | १० | ६ |
| | **एकूण** | **१५६** | **९३** |

**सोबत - विहीत नमुन्यातील योजनानिहाय अर्ज**

**आपला विश्वासु**

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली**

**प्रत -माहीतीसाठी व उचित कार्यवाहीसाठी -**
**पशुधन विकास अधिकारी (विस्तार)**
**पंचायत समिती , सर्व**